**ठळक बातम्या**

- पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादन शुल्कात प्रतिलीटर १० रुपये कपात/ मंत्रिमंडळ सदस्यांनी केलं निर्णयाचं स्वागत

- राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप ५० टक्क्यांवरून ७० टक्क्यांपर्यंत वाढवायचा केंद्र सरकारचा निर्णय

- खरीप हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा असल्याचं केंद्रीय रसायन आणि खत मंत्र्यांचं प्रतिपादन

- पश्चिम आशियातल्या युद्धस्थितीबाबत प्रधानमंत्री आज सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी संवाद साधणार

- होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्यासाठी इराणला अमेरिकेनं दिली ६ एप्रिलपर्यंत मुदत

आणि

- जेनिक सिनरचा मियामी खुल्या टेनिस स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इंधनाचे दर आटोक्यात राखण्याच्या दृष्टीनं केंद्र सरकारने तेलकंपन्यांना उत्पादन शुल्कातून प्रतिलीटर १० रुपये सूट दिली आहे. केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारान यांनी समाजमाध्यमावर हा निर्णय जाहीर केला असून तो आजपासून तात्काळ लागू झाला आहे. पेट्रोलवरचं प्रतिलीटर १३ रुपये उत्पादन शुल्क कमी करुन ३ रुपयांवर आणलं आहे, तर डिझेलवरचं प्रतिलीटर १० रुपये उत्पादन शुल्क पूर्णपणे काढून टाकलं आहे. यामुळे पेट्रोल आणि डिझेलचे दर कमी होतील अशी अपेक्षा आहे.

दरम्यान डिझेलवरच्या आणि विमानाच्या इंधनावरच्या निर्यातशुल्कात वाढ केली आहे. डिझेलवर साडे एकवीस रुपये प्रतिलीटर तर विमान इंधनावर साडे एकोणतीस रुपये प्रतिलीटर दराने निर्यात शुल्क लागू राहील. यामुळे या इंधनांचा देशांतर्गत पुरवठा वाढेल असं सीतारामन यांनी म्हटलं आहे.

कोविडकाळातल्या सारखा लॉकडाऊन लावण्यात येणार असल्याच्या अफवा असून त्यावर विश्वास ठेवू नये असं आवाहन त्यांनी निवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत केलं. राजकीय क्षेत्रातल्या व्यक्तींकडून अशा प्रकराची विधान होत असल्याबद्दल त्यांनी खंत व्यक्त केली.

**<><><><><>**

पेट्रोल आणि डिझेलवरच्या उत्पादनशुल्कात कपात करण्याच्या केंद्रसरकारच्या निर्णयाचं मंत्रिमंडळ सदस्यांनी स्वागत केलं आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळेल आणि सरकारचं लोकाभिमुख कार्य अधोरेखित होईल असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे.

पश्चिम आशियातल्या युद्धामुळे जगात सर्वत्र इंधनाचे दर वाढत असताना देशांतर्गत इंधन दर आटोक्यात ठेवण्यासाठी सरकारने स्वतः भार उचलल्याचं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी म्हटलं आहे.

युद्धाच्या झळा इंधन महागाईमुळे सामान्य माणसाला बसू नयेत याकरता केंद्रसरकार प्रभावी पावलं उचलत असून, या कामात राज्यसरकारांनीही हातभार लावावा असं आवाहन संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी केलं आहे.

- **- - होल्ड - - किरेन रिजिजू - -**

सरकारच्या या निर्णयाचा फायदा थेट ग्राहकांपर्यंत पोहोचत नसल्याची टीका काँग्रेसने केली आहे. लोकप्रियतेसाठी घोषणा करण्यापेक्षा सरकारने ठोस पावलं उचलावी असं काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेडा यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

**<><><><><>**

राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांना व्यावसायिक एलपीजीचं वाटप ५० टक्क्यावरून ७० टक्क्यापर्यंत वाढवायचा निर्णय केंद्र सरकारनं घेतला आहे. हा अतिरिक्त एलपीजी प्रधान्यानं पोलाद, ऑटोमोबाईल, वस्त्रोद्योग, रसायनं आणि प्लॅस्टिक उद्योगांना पुरवला जाईल, असं पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या पत्रकात म्हटलं आहे. पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर देशात एलपीजीचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

गेल्या दशकात युरियाचं देशांतर्गत उत्पादन २ कोटी ३० लाख मेट्रिक टनांवरून ३ कोटी १५ लाख मेट्रिक टनांपर्यंत वाढल्याची माहिती केंद्रीय रसायन आणि खते मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज लोकसभेत पुरवणी प्रश्नाच्या उत्तरात दिली. खरीप हंगामासाठी देशात पुरेसा खतसाठा असल्याचं ते म्हणाले..

**- - होल्ड.. बाईट - नड्डा - -**

जागतिक पातळीवर जेनेरिक औषधांच्या पुरवठ्यापैकी भारताचा वाटा ३० टक्के असल्याची माहिती केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी लोकसभेत दिली.

**<><><><><>**

पश्चिम आशियातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज विविध राज्यांच्या मुख्यमंत्र्यांशी दूरस्थ पद्धतीने संवाद साधणार आहेत. या बैठकीदरम्यान राज्यांची सध्याची तयारी, आपत्कालीन योजना आणि अन्य विविध उपाययोजनांचा आढावा घेतला जाईल.

निवडणूक आचारसंहिता लागू झालेल्या पाच राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीत सहभागी होणार नाहीत.

**<><><><><>**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला होर्मुझची सामुद्रधुनी खुली करण्यासाठी दिलेली मुदत 6 एप्रिलपर्यंत वाढवली असून तोपर्यंत इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करणार नाही, असं सांगितलं आहे. दरम्यान अमेरिकी सैन्याच्या आणखी हजार तुकड्या इराणच्या जवळ पोहोचल्या आहेत. इराणचा पाठिंबा असलेल्या हिज्बुलच्या विरोधात लढण्यासाठी इस्त्रायलनं दक्षिण लेबेनॉनमध्ये आणखी तुकड्या पाठवल्या आहेत. इराणनं होर्मुझच्या सामुद्रधुनीवरची पकड आणखी घट्ट केली असून इस्रायलवर क्षेपणास्त्रांचा मारा सुरूच ठेवला आहे. इराणमधे राजधानी तेहरानसह इतर शहरांवरही मोठ्या प्रमाणात हल्ले झाल्याचं वृत्त आहे.

**<><><><><>**

संयुक्त राष्ट्रांच्या महासचिव पदासाठीच्या निवडणुकीतून मालदीवने व्हर्जिनिया गँबा यांची तर चिलीने मिशेल बॅशलेट यांची उमेदवारी मागे घेतली आहे. त्यामुळे आता संयुक्त राष्ट्रांच्या

महासचिवपदासाठी फक्त तीन उमेदवार असून त्यात एक महिला आणि दोन पुरुषांचा समावेश आहे.

<><><><>

नेपाळचे ४७वे प्रधानमंत्री म्हणून राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचे नेते बालेंद्र शहा यांनी आज पदाची शपथ घेतली. राष्ट्राध्यक्ष रामचंद्र पौडेल यांनी बहुमताच्या निकषावर बालेंद्र शहा यांची प्रधानमंत्रीपदी नियुक्ती झाल्याचं जाहीर केलं. काठमांडूत शीतल निवास या राष्ट्राध्यक्ष कार्यालयात पौडेल यांनी नवनिर्वाचित प्रधानमंत्र्यांना पदाची शपथ दिली.

<><><><>

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची स्वाक्षरी लवकरच अमेरिकन डॉलरच्या नोटेवर दिसणार आहे. अमेरिकेच्या २५० व्या स्वातंत्र्यदिनाच्या निमित्ताने अमेरिकन अर्थ मंत्रालयानं हा निर्णय घेतला आहे. १८६१ मध्ये डॉलर नोटांची सुरुवात झाल्यानंतर पदारूढ अध्यक्षाची स्वाक्षरी चलनावर दिसण्याची ही पहिलीच वेळ असणार आहे.

<><><><>

जागतिक क्रमवारीतला दुसरा मानांकित टेनिसपटू, इटलीच्या यानिक सिनर याने मियामी ओपन टेनिस स्पर्धेच्या उपांत्यफेरीत प्रवेश केला आहे. त्याने उपांत्यपूर्व फेरीत अमेरिकेच्या फ्रांसेस टियाफो याचा ६-२, ६-२ अशा सरळ सेटमध्ये पराभव करत एकतर्फी विजय मिळवला.

<><><><>

बँकॉक इथं सुरू असलेल्या आशिया चषक जागतिक तिरंदाजी स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारतीय तिरंदाजांनी भारतीय खेळाडूंनी मिश्र सांघिक प्रकारात सुवर्ण पदक तर महिला संघानं रौप्य पदक जिंकलं आहे. पुरुषांच्या वैयक्तिक गटातही चांगली कामगिरी नोंदवत सर्व पदकं मिळवली. या स्पर्धेत भारतानं दोन सुवर्ण, दोन रौप्य आणि चार कांस्य पदक मिळवली आहेत.

<><><><>

छत्तीसढ इथं सुरू असलेल्या  खेलो इंडिया आदिवासी क्रीडा स्पर्धेचा आज तिसरा दिवस असून जलतरण, वेटलिफ्टींग, हॉकी आणि फूटबॉल क्रीडा स्पर्धा होणार आहेत. तर आज अंबिकापूर इथं कुस्तीचे सामने खेळले जाणार आहेत.

आज सकाळी झालेल्या महिलांच्या फूटबॉल सामन्यात झारखंडनं आसामला पराभूत केलं. तर गुजरातनं आंध्र प्रदेशला हरवलं.

**<><><><><>**

उत्तर भारतात आज रामनवमी साजरी होत आहे. अयोध्येत राम मंदिरातल्या सूर्य तिलक सोहळ्याचं दर्शन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी थेट प्रसारणाद्वारे घेतलं. त्यानंतर त्यांनी दूरस्थ पद्धतीनं पूजा केली.

त्यांनी देशभरात इतर ठिकाणी काल राम नवमीचा उत्सव साजरा झाला. या निमित्तानं प्रधानमंत्री मोदी यांनी समाज माध्यमावर संदेश लिहून देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या.

**//<><><><><>//**